|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001**

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

**(निवडणूक शाखा)**

जा.क्र.कबचौउमवि/२/निवडणूक/४६/२०२२ दिनांक १७/११/२०२२

प्रति,

1. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे मा.संचालक यांना ...
2. विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक प्रशाळांचे /विभागांचे मा.संचालक/मा.विभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख..

विषय :- **निवडणूक आदर्श आचारसंहिता नियमावली बाबत...**

महोदय,

विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरु झालेली असुन, विद्यापीठाच्या निवडणुका अत्यंत पारदर्शकपणे व नियमानुसार पार पाडण्याच्या हेतूने निदेश क्र.०७/२०२२ अन्वये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

तथापि, सदरहू आचारसंहितेतील काही बाबींसंदर्भात अधिक स्पष्टता व्हावी या दृष्टीने खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

1) ज्या महाविद्यालयांनी / मान्यताप्राप्त संस्थांनी संबंधित निवडणूक कार्यक्रम जाहिर होणेपुर्वी जाहिराती प्रसिध्द करुन उमेदवारांच्या मुलाखतीसाठी विद्यापीठाकडून निवड समिती सदस्यांची नावे घेतली आहेत आणि उमेदवारांना मुलाखतपत्रे पाठविण्यात आली आहेत, अशा मुलाखती आयोजीत करता येतील.

2) ज्या ठिकाणी जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. उमेदवारांकडून आवेदनपत्रे आलेली आहेत. निवड समिती सदस्यांची नावे विद्यापीठाकडून घेतली आहेत. तथापि, मुलाखतीची तारीख निश्चीत झालेली नाही, अशा ठिकाणी मुलाखती घेता येणार नाहीत.

3) शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी विद्यापीठाची पुर्वपरवानगी घेऊन शिक्षक व शिक्षकेतर पदांची जाहिरात प्रसिध्द करता येईल.

4) निवडणुकीसाठी जे उमेदवार इच्छुक असतील त्यांना स्थानिक चौकशी समितीवर अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून आचारसंहितेच्या काळात महाविद्यालयांना भेटी देता येणार नाहीत.

5) विद्यापीठाने आयोजित केलेल्या सभांना उपस्थित राहता येईल. मात्र अभ्यासक्रमांवरील चर्चासत्रांचे आयोजन करता येणार नाही.

6) विद्यापीठाने आयोजित केलेल्या (पूर्वपरवानगीने घेतलेली सभा) कोणत्याही सभांना आचारसंहिता लागू राहणार नाही.

7) विद्यापीठाच्या परिसरात कोणत्याही स्वरुपाचे आंदोलन, मोर्चे, जाहिर सभा यांचे आयोजन करता येणार नाही.

या संदर्भात विद्यापीठाचे निदेश क्र. ७ मधील इतर कलमे लागू आहेत याची नोंद घ्यावी. आचारसंहिता अंतिम टप्प्यातील निवडणूकीची मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लागू असेल. तरी सर्व संबंधितांनी वरील आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद पी. पाटील)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८

Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12 , 14 and 2257348

e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in